# जलप्रदूषणामुळे महासीर मासे लुप्त होणार?

## मासे वाचविण्यासाठी लोणावळा येथील प्रजनन केंद्रामार्फत 'टाटा पॉवर'चे प्रयत्न

**प्रतिनिधी, मुंबई**

वाढते शहरीकरण आणि जलप्रदूषण यामुळे महाराष्ट्राच्या नकाशावरून दुर्मीळ 'महासीर' ही माशांची जात जवळपास लुप्त होत चालली आहे. पुण्यातील मुळा-मुठा नद्यांच्या पात्रात सुरुवातीच्या काळात आढळणारे हे मासे त्यातील प्रदूषणामुळे गायब होऊ लागले असून त्यांच्या बचावासाठी सध्या जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यांचे जलस्रोतांमधून लुप्त होणे ही जलस्रोत मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याची सूचना आहे. यासाठी लोणावळा येथील वळवण धरण येथे त्यांची पैदास सुरू असून येथून राज्यात व राज्याबाहेरील जलाशय व नद्यांमध्ये त्यांना सोडण्यात येत आहे. तरीदेखील त्यांच्या संख्येत वाढ होत नसल्याने पर्यावरणवाद्यांकडून त्यांच्या संवर्धनाची मागणी जोर धरत आहे.

महासीर हे मासे गोड्या पाण्यातील वाघ म्हणून ओळखले जातात. मात्र, राज्यातील गोड्या पाण्याचे स्रोत प्रदूषित होत असल्याने त्यांचा या माशांच्या प्रजननावर मोठा परिणाम झाला आहे. हा मासा ९ फूट लांबीपर्यंत वाढत असल्याने त्याची जगातील २० सगळ्यात मोठ्या माशांमध्ये गणना होते. मात्र, त्यांची संख्या रोडावल्याने त्यांची धोकादायक म्हणून नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे या माशांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेत 'टाटा पॉवर'ने महाराष्ट्र सरकारच्या साथीने लोणावळा येथे १९७५ पासून त्यांचे संवर्धन करण्यास सुरुवात केली. येथे या माशांचे एक मोठे प्रजनन केंद्र तयार करण्यात आले असून येथे ५ एकराच्या जागेत प्रजननासाठी छोटे-मोठे तलाव तयार करण्यात आले आहेत. या प्रजनन केंद्रात जवळपास ५ ते १० लाख महासीर माशांची पैदास दर वर्षी करण्यात येते. या माशांचे ज्या सरकारी संस्थांना संवर्धन करायचे आहे त्यांना जन्मलेले महासीर मासे सुपूर्द करण्यात येतात. महाराष्ट्र सरकार जवळपास ५ लाख नव्याने जन्मलेले महासीर मासे या केंद्रातून दर वर्षी संवर्धनासाठी घेते, तर दर वर्षी दीड लाख महासीर मासे कर्नाटक सरकार आणि ५० हजार महासीर माशांची मागणी हरयाणा सरकार करते. मुंबईतील पवई तलावात येथून आणलेले दर वर्षी ४० हजार महासीर मासे सोडण्यात येतात. ९ फूट लांब वाढणाऱ्या या माशाचे वजन ४० ते ५० किलोपर्यंत असते. त्यामुळे या माशांना पकडून सोडण्याचा खेळही अनेक ठिकाणी केला जातो. याबाबत सांगताना राज्याच्या मत्स्य विभागाचे आयुक्त एम. बी. गायकवाड म्हणाले की, महासीर माशांचे प्रजनन हे राज्यात मुख्यत्वे पुणे व सातारा जिल्ह्यात होते. म्हणूनच लोणावळा येथे प्रजनन केंद्र सुरू असून नंदुरबार येथेदेखील हे मासे आढळून आले आहेत.



### प्रदूषण थांबणे आवश्यक

'टाटा पॉवर'च्या या प्रजनन केंद्रात आजवर अनेक शाळा आणि संस्थांनी भेटी दिल्या असून महासीर मासे प्रजननाची सगळी प्रक्रिया आम्ही त्यांना समजावून सांगतो. हे मासे गोड्या पाण्यात जगणारे असल्याने त्यांची कमी होणारी संख्या ही जलस्रोतांमध्ये प्रदूषण वाढल्याचे सूचित करते. या माशांची राज्यातील जलाशयांमध्ये संख्या वाढविण्यासाठी आधी प्रदूषणावर मात करावी लागणार आहे, असे या 'टाट पॉवर'च्या प्रजनन केंद्रातील संचालक विश्वासराव यांनी सांगितले.